जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०५/२०२४
## दि.०४/०५/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे.९५/२०२४,भादविक ३०७,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | चेतन घावटे वय ३६ वर्ष रा.मंगळवार पेठ पुणे |
| **आरोपीत** | १) कादर महंमद अली शेख वय ४२ वर्ष रा.सदाआनंद नगर मंगळवार पुणे २)बिलाल मोहम्मद शेख वय ४२ वर्ष रा.सदर (अटक) व एक महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०५/२०२४ रोजी ००/३० वा.चे सुमारास सहावा मजल्यावर फिर्यादी यांच्या घरासमोर व त्यानंतर साक्षीदार यांच्या घरात सदाआनंद नगर मंगळवार पेठ पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांचा मुलगा याने सदाआनंद नगर मंगळवार पेठ पुणे येथे दिनांक ०३/०५/२०२४ रोजी तळमजल्यावर सोसायटीची लिफ्ट उघडून येण्याजाणा-या लोकांना अडथळा करीत असताना यातील फिर्यादी यांनी त्यास तु एवढी गर्दी असताना लिफ्ट उघडी ठेवून लोकांना त्रास का देतो? असे म्हणाले. त्या कारणावरुन वर नमुद केले ता.वेळी यातील नमुद इसम यांनी संगनमताने फिर्यादी यांच्या घरासमोर जाऊन रागाने फिर्यादी व त्यांची पत्नी यांना शिवीगाळ करुन हाताने,लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व त्यानंतर फिर्यादी व त्यांची पत्नी हे घाबरुन साक्षीदार यांच्या घरामध्ये गेले असता, फिर्यादी यांना पकडून साक्षीदार यांचे घरातुन काच घेऊन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या डोक्यात जोरात मारुन त्यांना गंभीर जखमी केले.तसेच पत्नीचे केस धरुन मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.प्रेरणा कुलकर्णी, मो.नं.९०८२५३३०९६ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे.१६३/२०२४,भादविक ३९२,४५२,४२७,५०४,५०६(२),३४ भा.ह.का.कलम ४(२५), म.पो.कायदा ३७ (१)(३)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २० वर्ष रा.गुलटेकडी पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०५/२०२४ रोजी दुपारी ०२/२० वा.जय शिवराय मित्र मंडळा समोर मीनाताई ठाकरे औदयोगिक वसाहत,गुलटेकडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे शेजारी राहणारा इसम असे फिर्यादी यांचे घरात टिव्ही पाहत असताना फिर्यादी यांना घराबाहेर गोंधळ चालु असल्याचा आवाज आल्याने ते दोघे घरा बाहेर आले असता वर नमुद ठिकाणी श्रीकांत मिरगणे यांना यातील नमुद इसम हे त्यांना मोठया आवाजात बोलुन तु आम्हाला ५०० रु.दारु पिण्यासाठी दे नाहीतर हातामध्ये असलेले लोखंडी हत्यार मारीन अशी धमकी देऊन त्यांचे शर्टचे खिशातील ५००/- रु.जबरदस्तीने काढुन घेवुन अंगणवाडीच्या लाकडी दरवाज्यावर कोयत्याने जोर-जोरात मारुन दहशत निर्माण केली. त्यानंतर यातील नमुद इसम हे फिर्यादीला पाहुन फिर्यादी यांचे घरात येवुन घरातील सामान व भांडी अस्ताव्यस्त फेकुन देवुन,कपाटाचे काचेवर कोयता मारुन काच फोडली,व फिर्यादीस आम्हाला पैसे दे नाहीतर तुला मारुन टाकीन अशी धमकी देवुन लोखंडी हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशा मधील ४८००/-रुपये जबरदस्तीने हिसकावुन घेवुन फिर्यादी यांच्या घराच्या दरवाज्यावर हत्याराने मारुन दरवाजाचे नुकसान केले व घराचे बाहेर पार्क केलेली ॲक्टीव्हा गाडी हीचे सीट कव्हर कोयत्याने फाडुन गाडीचे नुकसान केले आहे. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.पुनम पाटील मो.नं.८६००४४४५६९ |
| **३** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे.२६९/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,मो.वाहन कायदा कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | प्रविण जागडे, वय ४३ वर्षे, रा.धायरी,पुणे |
| **आरोपीत** | ज्ञानेश्वर केशवराव शिवदे, वय ५१ वर्षे,रा.आगा पार्कींग, गणराज ढाब्याचे मागे,दत्तनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०५/२०२४ रोजी सकाळी ०५/३० वा. सुमारास श्री गणेश टायर्सचे दुकानाचे समोर, गारमाळ, धायरी रोड, धायरी पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टाटा कंपनीची बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे भाऊ राहुल पांडुरंग जागडे, वय ४९ वर्षे, रा.फ्लॅट नं बी/०२,राजयोग अपार्टमेंट,शिंदे हॉस्पीटल शेजारी, धायरी फाटा,धायरी,पुणे यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून, अंगावरुन बसचे मागील चाक घालुन गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अक्षय पाटील मो.नं.९९२२२१०११० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे.७५२/२०२४,भादविक ३९२,५११ |
| **फिर्यादी** | एक महिला वय १९ वर्षे, रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | अथर्व दत्तात्रय शिंदे,वय १९ वर्षे,रा.वंदे मातरम चौकाजवळ,रामटेकडी,हडपसर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०५/२०२४ रोजी १४/३० वाजताच्या सुमारास गाडीतळ बस स्टॉप,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया बसची वाट पाहत गाडीतळ बस स्टॉप येथे हातात मोबाईल पकडून उभी असताना,नमुद इसमांनी,फिर्यादी यांना धक्का मारुन फिर्यादी यांचे हातावर जोराने फटका मारुन हातातील मोबाईल जबरीने चोरुन नेण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.मुलाणी मो.नं.९२२६९९८९३० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे.१४२/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३८ वर्षे,रा.बालाजीनगर,पुणे, |
| **आरोपीत** | व्हॉटसअप ग्रुपचे धारक वापरकर्ते, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद व्हॉटसअप ग्रुपचे वापरकर्ते,वेबसाईटचे वापरकर्ते यांनी शेअर ट्रेडिंग करण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचे ॲक्सिस बँकखाते व एचएसबीसी बँकखाते यावरून वेगवेगळया ट्रान्झॅक्शन व्दारे १०,३१,०००/-रूपये ट्रान्सफर करून घेऊन फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.उत्तम भजनावले मो.नं.८१०८९६१५१५ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे.७५०/२०२४,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | अमित वाघमोडे वय ३५ वर्षे रा.कवडीपाठ ता.हवेली जि.पुणे |
| **आरोपीत** | नऊ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०४/२०२४ रोजी ११/१५ वा पुर्वी साधना शाळेमागे माळवाडी हडपसर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ अतुल बबन वाघमोडे वय ३७ वर्षे यास त्याची पत्नी तेजश्री हिने लग्नानंतर काही दिवसातच त्याचे सोबत भांडण करुन त्याला मानसिक त्रास दिला तसेच तिचे नातेवाईक या सर्वाचे मानसिक त्रास व दबावामुळेच फिर्यादी यांचा भाऊ अतुल वाघमोडे यास राहते घरी गळफास घेवुन आत्महत्येस प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.सुवर्णा गोसावी मो.नं.७२७६२९२१०६ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे.१६१/२०२४,भादविक ३७९,३४,४२७ |
| **फिर्यादी** | निखिल महाबळेश्वरकर,वय ४३ वर्षे,रा.सहकारनगर पुणे |
| **आरोपीत** | चार अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०२४ रोजी पहाटे ०३/३५ वा.ते ०३/५० वा.चे दरम्यान आमृत अपार्टमेंट,स्वानंद सोसायटी ग.नं.१,सहकारनगर नं.०२ लक्ष्मीनगर पुणे चे गार्डन मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची फिर्यादी की, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद अज्ञात इसमांनी फिर्यादी यांचे अपार्टमेंटमधील २५,०००/-रु.किं.चे एक २५ वर्षे जुने चंदनाचे झाड स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता चोरुन नेले तसेच ते करत असताना सदर झाडाचा उर्वरीत भाग फिर्यादी यांचे मित्र यांचे कारवर पडल्यामुळे कारचे पुढील बाजुचे बोनेट व उजव्या बाजुचा साईड पॅनेल चेंबुन नुकसान झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार मो.नं. २४२२०२०५ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे.४००/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६१ वर्षे रा.बाणेर पुणे |
| **आरोपीत** | व्हॉटसअप ग्रुपचे धारक वापरकर्ते, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील मोबाईल,व्हॉटसअप व लिंक ग्रुपचे वापरकर्ते,यांनी शेअर ट्रेडिंगमध्ये नफा मिळवून देण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचे आयसीआयसीआय बँक खाते क्रमांकावर वेगवेगळ्या ट्रान्झॅक्सनद्वारे २४,८०,०००/- रूपये ट्रान्सफर करून घेऊन फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.नांद्रे (गुन्हे)मो.नं.९८८१६७०६५९ |
| ९ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे.२४७/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३५ वर्षे रा.कदमवाकवस्ती ता.हवेली जि.पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची की फिर्याद की,वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी वर नमुद अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणुक करुन त्यामधुन चांगला परतावा मिळेल असे अमिष दाखवुन ३,४१,५००/-रुपये इतक्या रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.शशिकांत चव्हाण मो.नं.९८९२९२३३३० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**